# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## वार्षिक अहवाल
## २००४ - २००५

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## चौथा वार्षिक अहवाल

## एप्रिल २००४-मार्च २००५

# अनुक्रमणिका


प्रस्तावना

१ प्रास्ताविक १

२ आयोगाने हाताळलेल्या तक्रारी २

३ तक्रारींचे स्वरूप २

४ स्वयंखुद्द दखल घेतलेली प्रकरणे ४

५ कैदेतील मृत्यू संबंधी ५

६ निकाली काढलेल्या प्रकरणांचे वर्गीकरण ५

७ अटक झालेल्या व्यक्तींचे अधिकार ६

८ उप समितीची रचना ७

९ आकस्मिक भेटी ७

१० निरीक्षण आणि निर्देश ९

११ मानवी हक्कांच्या शिक्षण व संवर्धनासाठी प्रोत्साहन (कार्यसत्र व कार्यशाळा) १२

१२ जागतिक मानवी हक्क दिन साजरा १४

१३ प्रशासकीय व न्यायिक सहाय्य १७

१४ आयोगाने निर्णय दिलेल्या दृष्टान्युक्त प्रकरणे १८

१५ आयोगाचे कार्य १८

१६ आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रकाशझोत २५


वाव ११७०–१ अ

## प्रस्तावना

सरकारी नोकरांकडून मानव अधिकारांची पायमल्ली होत असल्याच्या तक्रारी मानव अधिकार आयोगाकडे येतात. मानव अधिकार आयोग त्याचे वैयक्तिक आणि संयुक्तिक समाधानासाठी प्रयत्नशील आहे. कायद्याच्या तरतुदीनुसार आतापर्यंत आयोगाने प्रत्येक व्यक्तीला मानव अधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ मधील कलमान्वये सुरक्षितता प्रदान केलेली आहे.

आयोगाने त्यावर खात्रीपूर्वक काम केलेले असून समाधानकारक उद्दिष्ट सफल केलेले आहे. आम्हाला आशा आहे की, भविष्यामध्ये जास्त उद्दिष्ट्ये सफल होतील ; त्यासाठी आयोग प्रयत्नशील आहे. आयोगाने वार्षिक अहवाल सादर करण्याकरिता सर्व प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत. आम्हाला सन २००४-२००५ चा अहवाल सादर करण्यास आनंद होत असून आम्ही तो अहवाल विधानसभेत ठेवण्यासाठी मानव अधिकार संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम २८ नुसार शासनास सादर करीत आहोत.

सध्याचे सदस्य २००६-२००७ साली रुजू झाले व अध्यक्ष २००७-२००८ साली आयोगामध्ये रुजू झाले. त्यानंतर या वार्षिक अहवालाचे शिल्लक राहिलेले काम प्राधान्याने हाती घेऊन ते पूर्ण करून सादर करण्यात आले.

**न्यायाधीश श्री. क्षितिज व्यास**

अध्यक्ष

| | | |
|---|---|---|
| **न्यायाधीश श्री. व्ही. जी. मुन्शी** | **श्री. टी. सिंगारवेल** | **श्री. सुभाष लाला** |
| सदस्य | सदस्य | सदस्य |

# प्रकरण १

## प्रास्ताविक :

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ या वर्षाचा चौथा वार्षिक अहवाल आहे.

१.२. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची ६ मार्च २००१ रोजी स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याचे मा. राज्यपालांनी, मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ चे कलम २२ प्रमाणे अध्यक्ष व तीन सभासदांच्या नेमणुका करण्यासाठी आदेशावर स्वाक्षरी केली. आयोग त्याप्रमाणे पुर्ण शक्तीने कार्यकारी अध्यक्ष व सदस्य असा कार्यान्वित झाला.

१.३. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग शासनाच्या गृह खाते ठराव क्र. एच.आर.सी.१०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० प्रमाणे स्थापन झाला. आयोग ६ मार्च २००१ पासून कार्यान्वित झाला.

१.४. आयोग स्वयंखुद्द किंवा मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा पीडित व्यक्ती किंवा कोणतीही व्यक्ती स्वतः होऊन अर्ज किंवा प्रार्थनापत्र दिल्यानंतर, किंवा एखाद्या व्यक्तीने मानवी हक्कांच्या उल्लंघनाविषयी किंवा त्याला मदत करण्या-या विषयी तक्रार दिली असेल, किंवा अशा प्रकारचे उल्लंघन रोखण्यासाठी शासकीय सेवकाने केलेल्या निष्काळजीपणाबद्दल तक्रार दिल्यावर चौकशी करू शकते.

## आयोगाची रचना :

१.५. माननीय कार्यकारी अध्यक्ष श्री. ए. डी. माने, हे कार्यकारी अध्यक्ष म्हणून कार्यरत राहिले. डॉ. व्ही. एस. चिटणीस, श्री. एम. आर. पाटील व श्री. सी.एल. थुल आयोगाचे सदस्य म्हणून कार्यरत राहिले. आयोगाचे सचिव श्री. अमिताभ चंद्र (आय.ए.एस.) व श्री. सुभाष आवटे (आय.पी.एस.) विषेश पोलीस महानिरीक्षक (तपास शाखा) म्हणून कार्यरत राहिले.

१.६. यावर्षी श्री. बेलोरकर यांनी आयोगाचे प्रबंधक म्हणून दि. ९ मार्च २००४ रोजी कार्यभार सांभाळला तत्पूर्वी श्री. पुरोहीत आयोगाचे प्रबंधक म्हणून दि. १ मार्च २००४ पर्यंत राहिले.

## प्रकरण २

**आयोगाने हाताळलेल्या तक्रारी :**

२.१. प्रस्तूत वर्ष आयोगाच्या कार्याचे चौथे वर्ष आहे व आयोगाने हाताळलेल्या तक्रारींवरून असे दिसते की, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या कार्याबाबत जागृती निर्माण झालेली दिसून येते. त्यामुळे आयोगाकडे तक्रारी घेऊन येणा-या व्यक्तींची संख्या वाढली आहे.

**सांखिकी माहिती :**

२.२. १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ दरम्यान एकूण ३,३८४ नवीन प्रकरणे मिळाली त्यापैकी २,९६४ प्रकरणे निकाली काढली.

२.३. यावर्षी मिळालेल्या नव्या प्रकरणांची जर गेल्यावर्षी मिळालेल्या नव्या प्रकरणांबरोबर तुलना केली तर यावर्षी २,२२६ प्रकरणांची वाढ झालेली दिसते. म्हणजेच अंदाजे ५२ टक्के वाढ झालेली आहे.

२.४. २००४-०५ वर्षी, १४९ प्रकरणे आयोगाच्या तपास खात्याकडे तपासासाठी पाठविली, व गेल्यावर्षाची तपासाधीन प्रकरणे ६३ होती. त्यापैकी ९० प्रकरणांमध्ये तपास पूर्ण करून आयोगास अहवाल सादर केला. या वर्षी १२२ प्रकरणे तपासाधीन आहेत.

२.५. या वर्षी आयोगाने स्वयंखुद्द दखल २५ प्रकरणांमध्ये घेतली.

**तक्रारीचे स्वरूप :**

२.६. आयोगाला मिळालेल्या ३,३८४ तक्रारींचा विश्लेषणात्मक अभ्यास केला गेला व त्या खालील वर्गवारीनुसार विभागल्या गेल्या आहेत.

**कायद्यांन्वये आयोगाकडे चालणारी प्रकरणे :**

(१) **पोलीसदलाविरुद्धच्या तक्रारी :** या तक्रारींमध्ये जास्त करून पोलीसांनी शक्तीचा गैरवापर, गून्हा नोंद न करणे, खोट्या प्रकरणांमध्ये गुंतवणे, गैरकानुनी अटक, भ्रष्टाचार, इ. प्रकारच्या तक्रारी—(१,०४६ प्रकरणे)

(२) **इतर शासकीय निगम :** या वर्गामध्ये ग्राम पंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महानगरपालिका व नगरपालिका इ. विरुद्धच्या तक्रारींचा समावेश आहे.—(२४९ प्रकरणे)

(३) **इतर शासकीय विभाग :** या वर्गामध्ये गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, समाजकल्याण विभाग, इत्यादी विरुद्धच्या तक्रारींचा समावेश आहे.—(३५५ प्रकरणे)

(४) मागासवर्गीय जाती, जमाती व इतर अल्पसंख्यांक यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुद्धच्या तक्रारी—(४७ प्रकरणे)

(५) जनहित संबंधीच्या तक्रारी—(४२ प्रकरणे)

(६) कैद्यांचे मानवी हक्क उल्लंघनासंबंधीच्या तक्रारी—(४० प्रकरणे)

(७) मुलांचे हक्क उल्लंघनासंबंधीच्या तक्रारी—(३२ प्रकरणे)

(८) वैद्यकीय निष्काळजीसंबंधीच्या तक्रारी—(४८ प्रकरणे)

**कायद्यांन्वये आयोगाकडे न चालणारी प्रकरणे :**

(९) नोकरी प्रकरणासंबंधीच्या तक्रारी—(३२७ प्रकरणे)

(१०) कौटुंबिक वादाबद्दलच्या तक्रारी—(१४० प्रकरणे)

(११) जमीनजुमला वादासंबंधीच्या तक्रारी—(७१ प्रकरणे)


(१२) बँकेसंबंधी तक्रारी—(५३ प्रकरणे)

(१३) खाजगी व्यक्तींविरुद्धच्या तक्रारी—(७६१ प्रकरणे)

(१४) खाजगी कामावर ठेवणा-या मालकाविरुद्धच्या व मजुरीसंबंधीच्या तक्रारी—(४८ प्रकरणे)

(१५) संकीर्ण बाबी —(१२५ प्रकरणे)

**तक्रारींच्या प्रकारांचे विभाजन आलेखाद्वारे खालीलप्रमाणे केले आहे :—**




२.७. हे लक्षात घेणे खरोखरच आश्चर्यकारक आहे की, कायद्यान्वये आयोगाकडे चालणा-या प्रकरणांमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे पोलीस दलाविरुद्ध आहेत. ही गोष्ट गंभीरपणे घेतलेली आहे व आयोगातर्फे पोलीस व जिल्हास्तरीय प्रशासन यांचेसाठी शिक्षण व जागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

२.८. मोठ्या प्रमाणावर आयोगाकडे अशी प्रकरणे आली की, जी कायद्यान्वये आयोगाकडे न चालणारी आहेत. यावरून असे दिसते की आयोगाचे अधिकार व कार्य याबद्दल शिक्षण व जनजागृतीची कमतरता आहे. या समस्येला आळा घालण्यासाठी उपाययोजना ठरवलेली आहेत. आयोगाचे सदस्य शिक्षण व जनजागृती वाढविण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी भेटी व व्याख्याने देऊन सुनावणी करीत आहेत.

**आयोगाने स्वयंखुद्द दखल घेतलेली प्रकरणे :**

२.९. दैनंदिन प्रकरणांमध्ये, आयोग पिडीत व्यक्तीकडून किंवा इतरांमार्फत तक्रार मिळाल्यानंतर कृती करते.

मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ प्रमाणे आयोगास मानवी हक्क उल्लंघनाच्या प्रकरणामध्ये चौकशी करणे, स्वयंखुद्द दखल घेऊन किंवा पिडीत व्यक्तीकडून तक्रार आल्यानंतर प्रकरण हाताळण्याचे अधिकार आहेत. हे आयोगाच्या कार्यावरून सिद्ध होते. यावर्षी आयोगाने खालील प्रकरणामध्ये स्वयंखुद्द दखल घेतलेली आहे.

**प्रकरण नं. १** : शिक्षण अधिका-याने छळ केल्यामुळे माधव मालशेतकर, सेंट्रल प्रायमरी स्कुलच्या मुख्याध्यापकाने आत्महत्या केली.

**प्रकरण नं. २** : शाळेमध्ये मानसिक छळ केल्याबद्दल.

**प्रकरण नं. ३** : दलित महिलेला पोलीस निरिक्षक एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे यानी जिवंत जाळल्याबद्दल.

**प्रकरण नं. ४** : बी.एम.सी. ने हलक्या दर्जाचे अन्न दिल्याबद्दल.

**प्रकरण नं. ५** : पॉकेट मारणा-या स्त्रिचा पोलीस कोठडीमध्ये मृत्यु.

**प्रकरण नं. ६** : पोलिसाने ऑटोरिक्शा चालक (मोहमद आरीफ लादीवाला) यास झोडल्याबद्दल.

**प्रकरण नं. ७** : अक्कलकुवा तालुक्यामध्ये कथीत स्त्रियांच्या होणा-या अनैतिक व्यापाराबद्दल.

**प्रकरण नं. ८** : जोडप्याला पोलिसांनी बळजबरीने पैसे काढण्यासाठी धमकाविले.

**प्रकरण नं. ९** : पैठण पोलीस ठाण्यामध्ये (माणिक नाथा शाहाराव) पोलिसांच्या छळामुळे अपंग व्यक्तीने आत्महत्या केल्याबद्दल.

**प्रकरण नं. १०** : पोलिसांनी मारहाण केल्यामुळे उदय भांडगे या तरूणाचा मृत्यु.

**प्रकरण नं. ११** : मुंबई महानगरपालिकेच्या निवृत्त अधिका-याची भूक हडताळबद्दल.

**प्रकरण नं. १२** : पोलिसांनी मारहाण केल्यामुळे (अशोक सानसी) या तरूणाचा मृत्यु.

**प्रकरण नं. १३** : पोलिसांनी मारहाण केल्यामुळे आरोपीचा मृत्यु (गिरीश वावेकर).

**प्रकरण नं. १४** : मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह सुविधा उपलब्ध नसल्याने शिक्षण चालू ठेवण्यास असमर्थ.

**प्रकरण नं. १५** : आर्थर रोड जेलमध्ये एच.आय.वी. ची धमकीबद्दल.

प्रकरण नं. १६ : उघडी मेनहोल,गटारे असल्याने ठाणे रहिवासींना भितीदायक आहेत.

प्रकरण नं. १७ : निवृत्तीवेतनधारकांच्या दु:खाबद्दल.

प्रकरण नं. १८ : डोंबिवली मानपाडा पोलीस कैदेमध्ये सुरेश दळवींच्या मृत्युबद्दल.

प्रकरण नं. १९ : २७ वर्षे वयाच्या माणसाच्या खुनामध्ये पोलीस हवालदार राजेंद्र पाटील कापूरबावडी पोलीस ठाणे, दारू प्यायलेला अवस्थेत पकडला गेला.

प्रकरण नं. २० : रहिवाशी इमारत असुरक्षित स्थितीत असल्यामूळे ४ वर्षाच्या मुलीचा मृत्य झाला.

प्रकरण नं. २१ : पोलिसांच्या मारामुळे चहा विकणारा रूपनारायण यादव याच्या मृत्युबद्दल.

प्रकरण नं. २२ : मागासवर्गीय व्यक्तींना राज्य वसतीगृहामध्ये वाईट परिस्थिती मुळे समस्या.

प्रकरण नं. २३ : गुपीत परिस्थितीमध्ये निलंबित पी.एस.आय., प्रताप काकडे यांचा पोलीस कैदेमध्ये मृत्युबद्दल.

प्रकरण नं. २४ : मंगला साटम हिस तक्रार नोंदविण्यासाठी पांच पोलीस ठाण्यांमध्ये पाठवून तिचा छळ केल्याबद्दल.

प्रकरण नं. २५ : पोलिसाने फेरीवाल्याला उघडया जागेवर लघवी केली म्हणून निर्दयीपणे मारल्याबद्दल.

**कैदेतील मृत्युबद्दल :**

२.१०. आयोगाला यावर्षी एकूण ३१० कैदेतील मृत्युबद्दल सूचना मिळाल्या. त्यापैकी २५० न्यायीक कैदेमध्ये असणा-या संबंधी, २३ भिक्षा गृहामध्ये मृत्युच्या संबंधी, १८ बालगृहांमध्ये मृत्युच्या संबंधी व १९ सूचना पोलीस कैदीतील होत्या. ३१० सूचनांपैकी २८१ पुरूष, ११ स्त्रिया व १८ मुले होती.

२.११. आयोगाने विविध प्रकरणे निर्णयात काढली. आयोगाच्या पद्धतीप्रमाणे ज्या प्रकरणांची राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने राज्य मानवी हक्क आयोगाच्या पूर्वी नोंद घेतलेली आहे, आयोग त्या प्रकरणात हस्तक्षेप करत नाही.

**यावर्षभरात आयोगाने निकालात काढलेल्या प्रकरणांचे वर्गीकरण :**

२.१२. आयोगाने २९६४ प्रकरणे निकालात काढली त्यापैकी १८०३ प्रकरणे प्रथमदर्शी स्वरूपात निकाली काढली, गैरअर्जदाराकडून अहवाल प्राप्त झाल्यावर ४३१ प्रकरणे निकाली काढली. गैरअर्जदाराकडून अहवाल प्राप्त झाल्यावर सुनावणी ऐकून घेतल्यावर ४०५ प्रकरणे निकाली काढली आणि आयोगाने ३२५ प्रकरणांमध्ये विविध विभागास निर्देश आणि सूचना दिल्या आहेत.

## प्रकरण ३

**अटक उप समितीचे अधिकार :**

३.१. भारताची राज्यघटना भारतीय नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचा उगम व आधार आहे. ते मुलभूत मानवी मूल्यांना संरक्षण देते. विश्वातील मूल्ये, स्वातंत्र्य, समता व बंधुत्त्व, जे संपूर्ण विश्वातील आधुनिक लोकशाही, संस्कृतीचे आधारस्तंभ आहेत, ते नेहमी गौरवशाली आहे.

कलम २१ मध्ये जीवनाचा व स्वातंत्र्याचा अधिकार दिले आहेत. त्यावरून असे दिसते, कोणीही व्यक्ती त्याच्या आयुष्यापासून किंवा वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित केला जाणार नाही, विधी नियम व पद्धतीप्रमाणे असे की, शासकिय सत्ता/शासकिय अधिकारी नागरिकांना त्याच्या जीवन व वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित करू शकत नाही.

घटना हमी देते की जिवीताचा हक्क व वैयक्तिक स्वातंत्र्य यामध्ये मानवी दर्जा व सन्मान याचा समावेश आहे. शासकीय नोकराकडून छळ व गैरकानुनी अटक होणार नाही याची सार्वभौम सत्ता हमी देते.

३.२. संविधानीक सुरक्षेनुसार कित्येक वैधानिक तरतुदी मानवी स्वातंत्र्य, मानवी दर्जा व मानवी हक्कांची रक्षा करण्यासाठी केलेल्या आहेत. अटक संदर्भात घटनेच्या कलम २२ मध्ये दखल घेतली असून विस्तारीत शब्द असे आहे, की त्यामध्ये सर्व प्रकरणांचा समावेश होतो, ज्यामध्ये मनुष्य कायदेशीररितीने व योग्य अधिका-याकडून न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पकडला गेला किंवा नाही हे निश्चीत केले जाते. एवढ्या पर्यंत सिमित नसून, ज्यामध्ये दिवाणी किंवा गुन्हेगारी न्यायालयाकडून किंवा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे व्यक्तीस अटक झालेली आहे, त्यामध्ये दंडात्मक आणि प्रतिबंधात्मक अटकेचा समावेश होतो. ज्या प्रकरणाबाबत ज्यांना सोयिस्कररित्या संरक्षणात्मक अटक म्हणून बोलावले जाते याचाही समावेश होतो.

३.३. फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ ची अंमलबजावणी मागील मुख्य हेतु हाच होता की अटक व पकडलेल्या व्यक्तींना शीघ्र न्याय व आरोपी व्यक्तीला प्रतिबंधात्मक अटक तपासीय पोलीस अधिका-यांनी निःपक्षपातीपणे केल्यास शीघ्र न्याय देण्यात येईल, म्हणून या कायद्यामध्ये कित्येक तरतुदी केलेल्या आहेत.

३.४. जरी तेथे कायदेशीर तरतूद व कार्यप्रणाली असूनही पोलीस छळ, तिस-या दर्जाच्या पद्धती, कोठडीतील हिंसा व गैरकानुनी अटक याबाबत तक्रारी वाढतच आहेत. असे दिसते की, चौकशी करणारे माहिती काढण्याच्या हेतुने चौकशी दरम्यान कोठडीत पिडा देतात. म्हणून, कोठडीतील हिंसेवर ताबा ठेवण्यासाठी व अटकेत असणा-या व्यक्तीच्या हक्कांच्या संरक्षणासाठी, माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत की, 'राज्यशासनाची कृती मात्र खरी, न्यायीक व योग्य असलीच पाहिजे. कुठल्याही प्रकारची माहिती काढण्यासाठी, कुठल्याही प्रकारचा छळ करणे योग्य किंवा न्यायीक नसेल'.

३.५. माननीय सर्वोच्च न्यायालयाने मुलभूत जीवनाचा व वैयक्तिक स्वातंत्र्याचा हक्क व मानवी दर्जा व मुल्यांचे संरक्षण करण्याच्या हेतूने डी. के. बासू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य (१९९७) एस.सी.सी. या सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामध्ये ११ मार्गदर्शक तत्त्व निर्देशीत केले आहेत. ते व्यक्तीला अटक करतेवेळी पाळणे

जरूरी आहे व पुढे आदेश दिला की, त्यांचे पालन न केल्यास संबंधित अधिकारी खात्यातील कार्यवाहीलाच जबाबदार नसेल तर स्वातंत्र्याचा अवमानासाठीसुद्धा जबाबदार असेल. ती कार्यवाही कुठल्याही स्वातंत्र्यात केली जाऊ शकेल.

३.६. कित्येक प्रकरणामध्ये माननीय न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होत आहे म्हणून माननीय सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासन व सर्व राज्य शासनास दि. १९ ऑक्टोबर २००१ नुसार सी.आर.एल.एम.पी. नं.४२१०/१९९७, ४१०५/१९९९, २६६० व २६०१/२०००, ४८०/२००१ व १२७०४/२००१ रिट पिटिशन (क्रिमिनल) नं.५३९/१९८६ व ५९२/१९८७ मध्ये राज्य मानवी हक्क आयोगास पुढे असे निर्देश दिलेले आहेत कि, उपसमित्या स्थापन करून व्यक्तीच्या अटक विषयी ११ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन पोलीस, कस्टम, वनविभाग इत्यादी चौकशी करणा-या यंत्रणेकडून पालन केले जाते काय त्याच्यावर लक्ष ठेऊन पालन करून घ्यावे. या मार्गदर्शक तत्त्वांचे पाठीमागे एकच हेतु आहे की, कोठडीतील हिंसा, छळ व अत्याचार यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची अधिका-यावर जबाबदारी टाकली जावी.

३.७. अशाप्रकारे माननीय सर्वोच्च न्यायालयाने मानवी हक्क आयोगाला डी. के. बासू प्रकरणामध्ये जी ११ मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत त्याच्यावर लक्ष ठेवण्याचे कार्य सुपूर्द केलेले आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने एक उप समितीची स्थापना केली, त्यामध्ये आयोगाचे सदस्य आहेत. सर्व संबंधित शासकीय यंत्रणेला परिपत्रक दिले आहे की, त्यांनी उप समितीला अहवाल सादर करावा.

**उप समितीची रचना :**

**३.८. उप समितीचे माननीय सदस्य खालीलप्रमाणे :**

(१) श्री. एम. आर. पाटील : उप समितीचे अध्यक्ष

(२) डॉ. व्ही. एस. चिटणीस : सदस्य

(३) श्री. सी. एल. थुल : सदस्य

(४) श्री. जे. आर. संगम : सचिव

**संबंधित शासन यंत्रणेकडून प्रतिसाद :**

३.९. आयोगाने परिपत्रक दिल्या प्रमाणे संबंधित शासन यंत्रणेकडून अहवाल प्राप्त झाले, सर्व पोलीस अधीक्षकांकडून त्रैमासिक अहवाल नियमित प्राप्त झाले.

**आकस्मिक भेटी :**

३.१०. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे डी. के. बासु प्रकरणामध्ये ११ गरजा व मार्गदर्शक तत्त्वे यांचे पालन होते किंवा नाही यांचे निरिक्षण करणे हे उप समितीचे मुख्य उद्देश व कार्य आहे. राज्यातील पोलीसं ठाण्यांना भेटी देऊन ११ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन योग्यरित्या होते की नाही यावर लक्ष ठेवणे.

(शा.म.मु.) वाय १२७०—४ (१०००–१२-२००९)

**२००४-०५ मध्ये खालील पोलीस ठाण्याना भेटी दिल्या गेल्या.**

| अनु. क्र. | पोलीस ठाण्याचे नाव | जिल्हा | भेटीची तारीख | माननीय सदस्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | कामटी पोलीस ठाणे | नागपूर | १०/४/०४ | श्री. सी. एल. थुल |
| २. | ठाणे नगर पो. ठाणे | ठाणे | २०/४/०४ | डॉ. चिटणीस |
| ३. | नौपाडा पो. ठाणे | ठाणे | २०/४/०४ | डॉ. चिटणीस |
| ४. | डोंबिवली पो. ठाणे (पूर्व) | ठाणे | २/६/०४ | डॉ. चिटणीस |
| ५. | वागळे इस्टेट पो. ठाणे. | मुंबई | २/६/०४ | डॉ. चिटणीस |
| ६. | भांडुप पो. ठाणे | मुंबई | १५/७/०४ | डॉ. चिटणीस |
| ७. | इतवारा पो. ठाणे | नांदेड | ९/९/०४ | डॉ. चिटणीस |
| ८. | शिवाजी नगर पोलीस ठाणे | नांदेड | ९/९/०४ | डॉ. चिटणीस |
| ९. | वजीराबाद | नांदेड | ९/९/०४ | डॉ. चिटणीस |
| १०. | रामनगर पोलीस ठाणे | चंद्रपूर | २/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| ११. | वलसांय पोलीस ठाणे | वलसांय | २/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १२. | मंडुप पोलीस ठाणे | सोलापूर | २/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १३. | सोलापूर तालुका पोलीस ठाणे | सोलापूर | २/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १४. | जेल रोड पोलीस ठाणे | सोलापूर | २/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १५. | सदर बाजार पोलीस ठाणे | सोलापूर | २/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १६. | फारसखाना पोलीस ठाणे | पुणे | १७/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १७. | विश्रामबाग पोलीस ठाणे | पुणे | १७/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १८. | बंदगार्डन पोलीस ठाणे | पुणे | १७/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| १९. | लष्कर पोलीस ठाणे | पुणे सिटी | १७/१०/०४ | डॉ. चिटणीस |
| २०. | अंजनी पोलीस ठाणे | नागपूर | १८/१०/०४ | श्री. सी. एल. थुल |
| २१. | गणेशपेठ पोलीस ठाणे | वर्धा | १८/१०/०४ | श्री. सी. एल. थुल |
| २२ | आर्वी पोलीस ठाणे आणि खरणगना पोलीस ठाणे. | वर्धा | १/११/०४ | श्री. सी. एल. थुल |

| अनु. क्र. | पोलीस ठाण्याचे नाव | जिल्हा | भेटीची तारीख | माननीय सदस्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| २३. | कलमेश्वर पोलीस ठाणे | नागपूर (ग्रामीण) | ३/११/०४ | श्री. एम. आर. पाटील |
| २४. | शाहुवाडी पोलीस ठाणे | कोल्हापूर | २१/११/०४ | श्री. एम. आर. पाटील |
| २५. | पार्शीवानी | नागपूर (ग्रामीण) | २७/११/०४ | श्री. एम. आर. पाटील |
| २६. | गंगाखेड | नागपूर (ग्रामीण) | २७/११/०४ | श्री. एम. आर. पाटील |
| २७. | गंगाखेड पोलीस ठाणे | परभणी | १२/१२/०४ | श्री. एम. आर. पाटील |
| २८. | वाई पोलीस ठाणे | परभणी | १३/१२/०४ | श्री. सी. एल. थुल |
| २९. | लोणावळा (ग्रामीण) | सातारा | २४/१२/०४ | श्री. एम. आर. पाटील |
| ३०. | सिटी पोलीस ठाणे | पुणे | १५/१/०५ | श्री. सी. एस. थुल |
| ३१. | रामनगर पोलीस ठाणे | चंद्रपूर | १३/२/०५ | श्री. सी. एस. थुल |
| ३२. | अम्बेजोगाई पोलीस ठाणे | चंद्रपूर | १३/२/०५ | श्री. सी. एल. थुल |
| ३३. | अम्बेजोगाई पोलीस ठाणे | बीड | २७/२/०५ | श्री. सी. एस. थुल |
| ३४. | काटोल पोलीस ठाणे | नागपूर (ग्रामीण) | १२/३/०५ | श्री. सी. एस. थुल |

**निरीक्षण व शिफारशी :**

३.११. **माननीय सदस्य श्री. एम. आर. पाटील :**

(१) कलमेश्वर पोलीस ठाणे, नागपूर, ३ नोव्हेंबर २००४, साक्षीदारांच्या स्वाक्ष-या अटकेच्यावेळी घेतल्या नव्हत्या.

(२) वाई पोलीस ठाणे, सातारा, २४ डिसेंबर २००४, साक्षीदारांच्या अटक मेमोवर सह्या घेतलेल्या नव्हत्या. काही प्रकरणामध्ये वैद्यकीय तपासणीच्या तारखा व वेळ लिहिलेल्या नव्हत्या.

**माननीय सदस्य श्री. सी. एल. थुल :**

(१) तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे, पुणे (ग्रामीण) : १२ मार्च २००५, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, यांनी एका परिपत्रकाद्वारे सर्व पोलीस ठाण्यांना निर्देश दिले की, डी. के. बासु प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशासाठी एक वेगळी नोंदवही ठेवावी, पण या पोलीस ठाण्यात तशी नोंदवही ठेवली गेली नाही.

(२) अम्बेजोगाई पोलीस ठाणे, बीड : २७ फेब्रुवारी २००५

(अ) माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ११ मार्गदर्शक तत्त्वे दाखविणारा फलक लावला नव्हता.

(ब) अटक मेमो संदर्भातील सुचनांचे पालन केलेले नव्हते.

(क) अटक व्यक्तीचे अटक करते वेळी व प्रत्येक ४८ तासांनंतरचे त्याच्या वैद्यकीय तपासणीचे अहवाल ठेवलेले नव्हते.

(ड) अदखलपात्र गुन्ह्यांची नोंदवही व त्याची पोचवही ठेवलेली नव्हती.

(इ) अटक व्यक्तींच्या नातेवाईकाला अटकेची माहिती दिल्याची नोंद नव्हती.

(फ) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, यांनी एका परिपत्रकाद्वारे सर्व पोलीस ठाण्यांना निर्देश दिले की, डी. के. बासू प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशासाठी एक वेगळी नोंदवही ठेवावी, पण या पोलीस ठाण्यात तशी नोंदवही ठेवली गेली नाही.

(३) गंगाखेड पोलीस ठाणे, परभणी : १३ डिसेंबर २००४.

(अ) माननीय सर्वोच्च न्यायालयाचे ११ मार्गदर्शक तत्त्वे दाखविणारा फलक एका दूरच्या कोप-यामध्ये ठेवलेला आढळला.

(ब) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, यांनी एका परिपत्रकाद्वारे सर्व पोलीस ठाण्यांना निर्देश दिले की, डी. के. बासु प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशासाठी एक वेगळी नोंदवही ठेवावी, पण या पोलीस ठाण्यात तशी नोंदवही ठेवलेली नव्हती.

(क) अटक व्यक्तीच्या वैद्यकीय अहवालामध्ये विरोधाभास आढळला. त्यावरून असे दिसले की, अटक व्यक्तीचे व जखमी व्यक्तींचे परीक्षण झाल्यानंतर वैद्यकीय अधिका-याने वैद्यकीय प्रमाणपत्र पोलीस ठाण्याला दिले नसल्यामुळे कित्येक प्रकरणे पोलीस ठाण्यामध्ये पडलेली असून ती न्यायालयामध्ये पाठवू शकत नाही.

(४) शाहुवाडी पोलीस ठाणे, कोल्हापूर : २१ नोव्हेंबर २००४.

(अ) अटक व्यक्तींसाठींची नियमित कोठडी अस्तित्त्वात दिसली नाही.

(ब) वेगळा अटक मेमो व पोचपावती ज्यामुळे अटक व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकाला माहिती दिली जाते ते ठेवलेले नव्हते.

(क) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र, यांनी एका परिपत्रकाद्वारे सर्व पोलीस ठाण्यांना निर्देश दिले की, डी. के. बासु प्रकरणामध्ये दिलेल्या निर्देशासाठी एक वेगळी नोंदवही ठेवावी, पण या पोलीस ठाण्यात तशी नोंदवही ठेवली गेली नाही.

(५) रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर : २ ऑक्टोबर २००४.

(अ) माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेले ११ निर्देश दाखविणारा फलक पाऊस व हवामानामुळे पूर्णतः क्षतिग्रस्त झाला होता.

**माननीय सदस्य डॉ. व्ही. एस. चिटणीस :**

(१) पंढरपूर तालुका पोलीस ठाणे : ७ मार्च २००५.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

(२) लोणावळा ग्रामीण पोलीस ठाणे, पुणे : ५ जानेवारी २००५.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

(३) फारसखाना पोलीस ठाणे : १७ ऑक्टोबर २००४.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

(४) बंडगार्डन पोलीस ठाणे : १७ ऑक्टोबर २००४.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

(५) लष्कर पोलीस ठाणे, पुणे शहर : १७ ऑक्टोबर २००४.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

(६) मंडरूप पोलीस ठाणे, सोलापूर : २ ऑक्टोबर २००४.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

(७) सोलापूर तालुका पोलीस ठाणे : २ ऑक्टोबर २००४.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वांची नोंदवही ठेवली नव्हती.

३.१२. उप समितीने निरीक्षण करून दिलेल्या सर्व शिफारशी भेटीच्या वेळीच संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिका-यांना देण्यात आल्या. उप समितीला महाराष्ट्रातील सर्व जिल्हा पोलीस अधीक्षकांकडून माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या ११ आवश्यकता व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन होत असल्याचे त्रैमासिक अहवाल नियमित मिळत आहेत.

# प्रकरण ४

## मानवी हक्कांच्या शिक्षण व संवर्धनासाठी प्रोत्साहन-चर्चासत्र व कार्यशाळा

### मानवी हक्क व दुर्बल घटक यावर चर्चासत्र

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने 'मानवी हक्क व दुर्बल घटक' या मुद्द्यावर इंडिया सेंटर फॉर ह्युमन राईट्स व लॉ, मुंबई, या संस्थेबरोबर मिळून १९ ऑक्टोबर २००४ रोजी सह्याद्री गेस्ट हाऊस, मुंबई येथे परिसंवाद चर्चासत्र आयोजित केले.

४.२. अंदाजे २५ वरिष्ठ अधिकारी, त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव व इतर सचिव यांचा समावेश होता व दुर्बल घटकांच्या मानवी हक्कांसाठी कार्य करणा-या कार्यकर्त्यांनी त्यामध्ये सहभाग घेतला.

४.३. न्यायाधीश अनंत डी. माने, कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांनी उद्‌घाटनीय भाषण केले. त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी सांगितले की, मानवी हक्काची कल्पना 'मानव अधिकार सर्वांसाठी' अशा दृष्टीची आहे. दुर्बल घटकांच्या शिक्षणाबद्दल भारताची नीती याबाबत आंतरराष्ट्रीय नीतीवर लक्ष केंद्रित करतेवेळी त्यांनी सांगितले की, शासनाने प्राथमिक शिक्षणाचे जागतिकीकरण करण्याचे ध्येय राबविण्यासाठी प्रात्यक्षिक योजना दिल्या आहेत. त्यांनी असमर्थ दुर्बल घटकांकडे बघण्याचा दृष्टिकोन व प्रात्यक्षिक यामध्ये बदल आणण्यावर जोर दिला. पुढे त्यांनी सुचित केले की, दुर्बल घटक समाजाचे मुख्य अंग असले पाहिजे, व दुर्बल घटकांना तशा प्रकारचे सहायक वातावरण निर्माण करण्यासाठी समर्थन केले पाहिजे.

४.४. डॉ. मुन्शीलाल गौतम, मुख्य सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासनाचे दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी ज्या कृतीयोजना राबविल्या जातात त्याबद्दल सहभागींना अवगत केले. त्यांनी माहिती दिली की, दुर्बल घटकांसाठी राज्यामध्ये संयुक्त व स्वतंत्र दोन्ही शाळा आहेत. त्यांनी निरीक्षण केले की दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शहरामध्ये ज्या विशेष शाळा आहेत, त्यांचा दर्जा ग्रामीण भागातील शाळांपेक्षा चांगला आहे.

४.५. डॉ. जे. एम. पाठक, सचिव, शालेय शिक्षण खाते, यानी सांगितले की, जरी संविधानामध्ये ६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना शिक्षणाचा अधिकार दिला, पर्सन्स वीथ डिसएबिलिटिज (इक्वल ऑपारच्युनिटीज, प्रोटेक्शन ऑफ राईट्स ॲन्ड फुल को-ऑपरेशन) कायदा, १९९५ नुसार दुर्बल व्यक्तींना वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत मोफत शिक्षण देण्याची तरतूद केली आहे. पुढे, त्यांनी सांगितले की दुर्बल विद्यार्थ्यांना 'सर्व शिक्षा अभियान' या शासन योजनेअंतर्गत शिक्षण दिले जाते.

४.६. श्री. एस. ए. दत्तरांगे, अध्यक्ष, डिसएबल पिपल्स इंटरनॅशनल अन्ड इंडिया यांनी खालील निरीक्षण केले.

(१) जरी भारताने कित्येक आंतरराष्ट्रीय समझोते व करार यांना कबुली दिली आहे, जसे, आय.सी.सी.पी.आर., आय.सी.ई.एस.सी.आर., सी.ई.डी.ए.डब्ल्यू., सी.आर.सी., भारताने आय.एल.ओ. 'कन्व्हेशन ऑन व्होकेशनल ॲन्ड रिह्याबिलिटेशन ऑफ डिसएबल पर्सन्स, १९८३' वर स्वाक्ष-या केल्या नाहीत.

(२) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, दुर्बल माणसांच्या अधिकाराबद्दल मौन आहे.

(३) दुर्बल माणसांचे हक्क लक्षात ठेऊन मानव अधिकाराची सार्वभौम घोषणा, १९४८ कडे नवीन दृष्टीने बघणे आवश्यक आहे.

४.७. श्री. एम. आर. पाटील, सदस्य, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या अध्यक्षतेखाली ओपन हाऊस सेशन दरम्यान पुष्कळ मुद्यांवर चर्चा झाली. चर्चा झाल्यानंतर हाऊस खालील गोष्टींवर एकमत झाले.

(१) सामुहिक शिक्षणाला अशा दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे की, दुर्बल माणसांना समाजामध्ये समावेश करण्याकडे सुरूवात आहे.

व्हिलचेअर्सची उपलब्धता असली तरी रॅम्प्सची दुर्बलता असणा-या माणसांना आवश्यक असते, तसेच वयस्कर माणसांना सुद्धा उपयोगी असते.

(२) पर्सन्स विथ डिसएबिलिटीज (इक्वल ऑपारच्युनिटीज, प्रोटेक्शन ऑफ राईट्स अँड फुल को-ऑपरेशन), ॲक्ट, १९९५ ची अंमलबजावणीसाठी एक वेळबद्ध कार्यक्रम आखला पाहिजे व ही जबाबदारी शासनातील फक्त एका खात्याची नसून सर्व संबंधित विभागाची आहे.

(३) दुर्बल घटकांना सुरक्षात्मक सोयी-सवलती देण्यासाठी शासन कार्यक्षम असले पाहिजे.

(४) दुर्बल घटकांचा व्यवसायीक विकास होणे गरजेचे आहे.

**तुरूंगात व कोठडीत मानसिक आजारी असलेल्यांच्या मानवी हक्कावर कार्यशाळा :**

४.८. तुरूंगामध्ये व कोठडीमध्ये मानसिक आजार असलेल्याच्या मानवी हक्कावर शिक्षण देण्याकरिता सेवक, कलकत्ता, यांच्याबरोबर ५ ऑगस्ट २००४ रोजी पोलीस क्लब, मुंबई येथे एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, तेथे तुरूंग विभागातील व ताब्यात ठेवणा-या गृहातील अधिकारी उपस्थित होते.

४.९. एकूण ३१ कार्यालय कार्यशाळेमध्ये सहभागी झाले होते. ही कार्यशाळा तीन टप्प्यात विभागली होती, पहिल्या टप्प्यात प्रस्तावना व उद्‌घाटनिय भाषण, दुस-या टप्प्यात मानसिक आजार असलेल्या व्यक्तींची ओळख व त्यांच्या व्यवस्थेबद्दल, तर तिस-या टप्प्यात सहभाग घेणा-याकडून प्रकरणांचा अभ्यास, प्रात्यक्षिक व भाषणाकरिता होता. नाव नोंदणीच्यावेळी सहभाग घेणा-यांना कार्यशाळेच्या विषयासंबंधी वाचन सामग्री वाटण्यात आली होती.

४.१०. प्रास्तावीक भाषणामध्ये श्री. सुभाष आवटे, विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांनी सांगितले की, आरोग्याचा अधिकार, जो एक मुलभूत मानव अधिकार आहे, त्यामध्ये मानसिक आरोग्याच्या अधिकाराचाही समावेश होतो. त्यांनी मुख्य आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संस्था व महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची मानवी हक्क संरक्षण व प्रोत्साहन याबाबत कार्य व भुमिकेचा उल्लेख केला.

४.११. न्यायाधीश ए. डी. माने, माननीय कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, यांनी तुरुंगातील व कित्येक कोठडीतील वाईट परिस्थितीबद्दल खेद व्यक्त केला. तसेच मानसिक आजारी कैद्यांना इलाजासाठी लागणा-या सोयींची कमतरता व आयोगाने हाताळलेल्या काही तक्रारींचा सुद्धा उल्लेख केला. त्यांनी सर्व सहभाग घेणा-यांना विनंती केली की, त्यांनी सर्व मानसिक आजारी असणा-या व्यक्तींचे पालक म्हणून त्यांच्या आरोग्याच्या अधिकाराचे संरक्षण करावे.

४.१२. डॉ. अरनाब बॅनर्जी, मानसरोगतज्ज्ञ व अध्यक्ष, ‘सेवक’ यांनी ‘मानसिक रोग्याची ओळख’ या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी ‘ऑपरेशन ओसिस’ यांच्या शोधाचा उल्लेख केला, मानसिक आजारी व्यक्तीवर बरोबर उपाय केले जात नाहीत कारण, पालक त्यांना मानसिक रोगी आहे किंवा नाही हे ओळखु शकत नाही. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की मानसिक रोग हा मेंदुचा रोग आहे. पालक मानसिक आजार भावना व वागणुकीवरून ओळखु शकतात. डॉ. बॅनर्जी यांनी मुख्य मनोविकारांचे स्पष्टीकरण केले ; ते म्हणजे भाव अव्यवस्थितता, सिझोफ्रेनिया, भ्रम-अशा अव्यवस्थितता आहेत. त्यांनी मार्गदर्शन केले की, वागणुकीत दृष्टीकोनात जर बदल असेल तर ते त्याच्या हेतूविरुद्ध वागणुकीत व भावनेतून दिसते व ते अस्विकारणीय असते. त्याकडे दुर्लक्ष न करता त्याच्यावर उपचार केला पाहिजे.

४.१३. श्री. सी. एल. थुल, माननीय सदस्य यानी भाग घेणा-यांच्या प्रस्तुतीवर आपले मत व्यक्त करून त्यांच्या मतांचे विश्लेषण केले. श्री. एम. आर. पाटील, माननीय सदस्य यांनी समाप्तीचे भाषण दिले. दुस-या सत्रामध्ये जी चर्चा झाली व त्यांच्या स्वतःच्या अनुभवाचा उल्लेख केला. त्यांनी संबंधित अधिका-यांना सचेत होण्यावर जोर दिला. त्यांनी सहभाग घेणा-यांना त्यांची स्वतःची कर्तव्ये सच्चाईने पाळावी अशी कळकळीची विनंती केली.

**विश्व मानवी हक्क दिवस साजरा :**

४.१४. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने मानवी हक्क दिवस शुक्रवार १० डिसेंबर २००४ रोजी त्यांच्या मुंबईतील कार्यालयामध्ये साजरा केला.

माननीय न्यायाधीश सुजाता मनोहर, माजी सदस्य, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली व भारताच्या सर्वोच्य न्यायालयाचे माजी न्यायाधीश मुख्य अतिथी होत्या. न्यायाधीश आर. ए. जहागिरदार (निवृत्त) माजी न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय सन्माननीय अतिथी होते. कार्यक्रम श्री. ए. डी. माने कार्यकारी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्या अध्यक्षतेखाली झाला. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगातील सदस्य डॉ. व्ही. एस. चिटणीस, श्री. एम. आर. पाटील व श्री. सी. एल. थुल हे प्रसंगी हजर होते. प्रस्तावना पत्रक (मराठी), ‘मानवाधिकार सर्वांसाठी’, ‘रोल ऑफ दि स्टेट ह्युमन राईट्स कमिशन व ह्युमन राईट्स कोर्टस इन प्रोटेक्शन अँड प्रोमोशन ऑफ ह्युमन राईट्स’ इत्यादी साहित्य वाचनासाठी सर्व आमंत्रितांना वाटले गेले. कमीत कमी २०० स्वतः होऊन आलेले तसेच त्यामध्ये एन.जी.ओ. प्रतिनिधींचा समावेश होता.

४.१५. श्री. एम. आर. पाटील, सदस्य यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये सांगितले की, मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ या कायद्याने समाजातील सर्व स्तरावर मानवी हक्कांबद्दल जागृती निर्माण केली. त्यांनी नमूद केले की, काही वेळा आयोग, आयोगाच्या मुख्यालयाला फिर्यादीला बोलविण्यापेक्षा त्यांच्याच जिल्ह्यामध्ये जाऊन सुनावनीची व्यवस्था करते. त्यांनी शासनाच्या विविध दर्जाच्या नोकरांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यक्रमांची आवश्यकता आहे असे मत व्यक्त केले.

४.१६. न्यायाधीश सुजाता मनोहर यांनी महत्त्वपुर्ण भाषण दिले, त्यांनी आपल्या दिर्घ अनुभवाने प्रेक्षकांना ‘मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३’ विषयी प्रकाश टाकला. तसेच राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने केलेल्या चांगल्या कामाबद्दल थोडक्यात सांगितले की, .गरीबी, निरीक्षता व जागृती नसल्यामुळे, मागासलेल्या

लोकांना आपल्या हक्कांबद्दल जाणीव नव्हती. अशा परिस्थितीमध्ये राज्य मानवी हक्क आयोग जे कार्य अनेक अडचणी असुनसुद्धा करीत होते, ते खरोखर स्तुतीस्पद आहे. मानवी हक्क आयोगाने बालमजुर, करार मजुर व स्त्रियांचे हक्क अशा प्रकारचे मुद्दे उठविले आहेत.

४.१७. न्याय संस्थेने जे महत्त्वपुर्ण काम केले आहे, त्याची जाण करून सर्वोच्च न्यायालयाने मानवी हक्क सुरक्षा व प्रोत्साहन देण्यासाठी जे विशेष निर्णय दिले त्याचा उल्लेख केला. पुन्हा त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या त्या आदेशाची आठवण केली, की मान्यताप्राप्त न्यायीक नियम, आंतरराष्ट्रीय करार व पद्धती यांना आपल्या अंतर्गत कायद्यामध्ये विचारात घेतले पाहिजेत, जेव्हा त्यांच्यामध्ये असंगती नसेल. त्यांनी सांगितले की, जनहित याचिकेतुन न्यायालयाने सामाजिक न्यायाचे मुद्दे घेतलेले आहेत.

४.१८. मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ चे पालन व पुर्तता करण्याविषयी त्यांनी काही कमतरता दाखविल्या व काही सुचना दिल्या. महत्त्वाच्या सुचना होत्या—

(अ) मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ प्रमाणे स्थापन केलेल्या मानवी हक्क आयोगाचे कार्य स्पष्ट केले पाहिजे व लोकांमध्ये जागृती निर्माण केली पाहिजे.

(ब) वेगवेगळ्या प्रकारच्या आयोगांमध्ये संबंध निर्माण केला पाहिजे.

४.१९. अध्यक्षीय भाषणामध्ये, न्यायाधीश ए. डी. माने कार्यकारी अध्यक्ष यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने केलेल्या कामाचे स्पष्टीकरण केले. मानवी हक्क दिवस साजरा करण्यामागचा हेतू स्पष्ट करतेवेळी ते म्हणाले की, ‘ मानवी हक्क कायद्यावर विश्वास पुन्हा दृढ करून आम्ही मानवी हक्क दिवस पाळत आहोत ’. संविधनाचा उल्लेख करीत त्यांनी जोर देऊन सांगितले की, घटनेमध्ये जे हक्क निश्चित केले आहे, त्यांचे परिणामकारक कृतीमध्ये रूपांतर झाले पाहिजेत. मानवी हक्क आयोगांचे वाढते महत्त्व सांगताना न्यायाधीश माने म्हणाले की मानवी हक्काचे संरक्षण व संवर्धन यांना प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय संस्था, अशासकीय संघटना व इतर संबंधितांचा सहभाग आवश्यक आहे.

**मानवी हक्कांवर कार्यशाळा**

४.२०. समर्थन या अशासकीय संघटनेने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या सहकार्याने एका प्रशिक्षण/ कार्यशाळेचे आयोजन २७ ते ३० मार्च २००५ दरम्यान केले होते.

४.२१. कार्यकर्ते, पत्रकार व वकील यांनी उस्फूर्त सहभाग घेतला. आयोगाचे सदस्य, सचिव आणि विशेष पोलीस महानिरीक्षक प्रमूख आमंत्रित म्हणून बोलावले गेले :—

कार्यशाळेत महत्त्वपूर्ण मुद्यांचा समावेश झाला, ते असे,—

- मानवी हक्काची मूळ संकल्पना
- आंतरराष्ट्रिय करार
- भारतीय घटना व मानवी हक्क
- गुन्हेगारी न्याय पद्धत

- मानवी हक्कांचे उल्लंघन रोखण्यासाठी कार्यपद्धत
- मानवी हक्क संरक्षण करण्यासाठी राज्य, साधने, कार्यकर्ते व वकील यांची भूमिका.

आयोगाची वेबसाईट :–

४.२२. आयोगाची स्वतःची एचटीटीपीः//एमएसएचआरसी.महाराष्ट्र.जीओव्ही.इन वेबसाईट आहे. वेबसाईट व आयोगाच्या जागेचा विस्तार यांचे माननीय उप मुख्यमंत्री व गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी २ मार्च २००५ रोजी उद्घाटन केले.

४.२३. आयोगाची वेबसाईट एक पुढचे पाऊल आहे, ज्यामुळे आयोग सर्वत्र पोहोचून आयोगाचा लोकांमध्ये संपर्क वाढेल. वेबसाईटमध्ये मागील माहितीच्या तपशीलाचाही समावेश केलेला आहे. त्यामुळे लोक आयोगाला इंटरनेटद्वारे परस्पर संपर्क करू शकतात.

४.२४. वेबसाईटची सुरूवात झाल्यापासून जनतेकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. वेबसाईट सतत आधुनिक करून त्याचा मित्रतापूर्ण व परिणामकारक वापर करावयाचा आहे. तसेच या वेबसाईटवर आयोगापुढील चालू प्रकरणे व निर्णय झालेल्या प्रकरणांबद्दल माहिती देण्यासाठी प्रयत्न चालू आहे.

# प्रकरण ५

**प्रशासकीय व न्यायीक सहाय :—**

महाराष्ट्र शासनाने जी. आर. नं. एच.आर.सी. १०९९/३७८/पोल.-१४, तारीख १५ जानेवारी २००० द्वारे महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग स्थापन केले.

५.१. आयोग ६ मार्च २००१ रोजी कार्यरत झाले व त्याचे खरे कार्य १२ मार्च २००१ ला सुरू झाले. ठरावामध्ये एक अध्यक्ष चार सदस्य व आयोगाचे मुख्यालय मुंबईला ठेवले कायम ठेवले आहे. न्यायाधीश अनंत माने, कार्यकारी अध्यक्ष डॉ. चिटणीस, श्री. एम. आर. पाटील व श्री. सी. एल. थुल आयोगाचे सदस्य म्हणून कार्य कार्यरत होते. वर्षाच्या शेवटपर्यंत अध्यक्ष ची जागा रिक्त राहिली.

**कर्मचारी :—**

५.२. आयोगाचे तीन शाखेतील कर्मचारी त्याच विभागात कायम होते. म्हणजे, प्रशासन शाखा सचिवांच्या अधिपत्याखाली, तपास शाखा, विशेष पोलीस महानिरिक्षक यांच्या अधिपत्याखाली व विधी शाखा प्रबंधकांच्या अधिपत्याखाली?

५.३. २००४-०५ दरम्यान आयोगाच्या सचिव श्रीमती रंजना सिन्हा, आय.ए.एस., १ जून २००४ रोजी बदली होऊन गेल्या त्यानंतर श्री. अमिताभ चंद्र, आय.ए.एस., आयोगाच्या सचिव पदावर १ जून २००४ रूजू झाले. श्री. सुभाष आवटे, आय.पी.एस., १९ डिसेंबर २००१ पासून विशेष पोलीस महानिरीक्षक, तपास, म्हणून कार्य करीत राहिले. श्री. डी. एस. पुरोहित आयोगाचे प्रबंधक १ मार्च २००४ पासून बदली होऊन गेल्यानंतर श्री. पी. आर. बेलोरकरानी ९ मार्च २००४ रोजी आयोगाचे प्रबंधक म्हणून भार सांभाळला.

**कार्यालयाची जागा :—**

५.४. महाराष्ट्र शासनाने शा.नि.ग्र.वि.एच.आर.सी. १०९९/३७८/पोल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० नूसार, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्यालय, मुंबई येथे असेल असे नमूद केले. त्याप्रमाणे शासनाने विविध जागेबद्दल प्रस्ताव केला, जसे नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, वरळी गव्हर्नमेंट ट्रान्सपोर्ट सर्व्हिस, अरूण चेंबर्स, ताडदेव, मुंबई, न्यू ॲडमिनिस्ट बिल्डिंग, बांद्रा (पूर्व) व ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे दिला.

शेवटी, शासन परिपत्रक क्र. जी. ए. ११०१/ सी. न. १५/२००१/२२, दिनांक २० जून २००२ द्वारे शासनाने २३८० चौरस फूट जागा ॲडमिनिस्ट्रेटीव स्टाफ कॉलेज बिल्डिंग, ९, हजारीमल सोमानी मार्ग, सी.एस.टी. समोर, मुंबई ४०० ००१, येथे आयोगाला दिली, ह्या जागेत पूर्वी राज्य वित्त आयोग कार्यरत होता. हा आयोग त्याच जागेमध्ये कार्य करीत आहे.

**साधने :—**

५.४. २००४-०५ वर्षा दरम्यान, राज्य सरकारने एकूण अनुदान १ करोड २४ लाख ६५ हजार ७०० रुपये एवढे दिले. त्यापैकी एकूण खर्च रुपये १ करोड १८ लाख ९१ हजार २८८ एवढा झाला. त्यापैकी ८१९७६९३ एवढा खर्च वेतन व भत्त्यावर झाला.

## प्रकरण ६

### आयोगाने निर्णय दिलेली उदाहरणात्मक प्रकरणे :

**(१) प्रकरण नं. ८६७/२००३**

| | | |
|---|---|---|
| तक्रारीची तारीख | : | ३० एप्रिल २००३ |
| फिर्यादी | : | श्री. जयवंत हनुमंत दामगुडे |
| प्रतिवादी | : | (१) दि कमिशनर ऑफ लेबर, मुंबई |
| | | (२) दि कमिशनर, बी.एम.सी., मुंबई |
| | | (३) दि कमिशनर ऑफ पोलीस, मुंबई |
| | | (४) दि पी.आय., गोवंडी पोलीस स्टेशन, मुंबई. |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचे स्वरूप :** वाढलेली लोकसंख्या, गरिबी, निरक्षरता, बेकारी व मानवी हक्कांबद्दल जागृकतेची कमतरता, या कारणास्तव लहान मुलांना जरी बनविण्याच्या क्रियेमध्ये/कारखान्यामध्ये कामावर ठेवले.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** आयोगाने सूचना दिली व तक्रारीवर २५ जून २००३ ला अहवाल सादर करण्यास सांगितले. त्याविषयी, अर्चना त्यागी, उप पोलीस आयुक्त, विभाग ६, मुंबई यांनी १७ सप्टेंबर २००३ रोजी अहवाल सादर केला व नमूद केले की कारखान्याचा मालक, सादिक मोहम्मद व इतर तीन लोकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादींचा जवाब सुद्धा नोंदवून घेतला.

**आयोगाचा निर्णय :** श्री. जयंत दामगुडे यांच्याकडून लहान मुलांना जरी बनविण्याच्या क्रियेमध्ये/कारखान्यामध्ये पिळवणूक केल्याबद्दल तक्रार मिळाल्यानंतर आयोगाने मध्यस्थी केली, मुख्य सचिव, मजूरखाते, महाराष्ट्र शासन, जिल्हा न्यायाधीश, उप पोलीस आयुक्त विभाग-६, मुंबई व आयुक्त महिला व बालकल्याण मुंबई, यांनी सर्व शक्य तेवढी पाऊले उचलली की, ज्यामुळे जरीच्या कामामध्ये काम करणा-या मुलांच्या अधिकारांचे संरक्षण होईल व जरी कामाच्या मालकावर खटला दाखल केला आहे. जी मुले जरीचे काम करीत असताना आढळली ती जास्तीत जास्त यु.पी., बिहार, नेपाळ व बांग्लादेशातील होती त्यांची तेथून मुक्तता करून त्यांना मुलांचे संरक्षण व हक्कासाठी काम करणा-या संस्थेच्या ताब्यात देण्यात आले. तसेच मुलांना त्यांच्या आई-वडिलांच्याकडे पाठविण्यात आले. आयोगाच्या निरीक्षणात आले की बालकामगार मागचे कारण मोठी लोकसंख्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी व मानवी हक्कांबद्दल जागृतीचा अभाव आहे. अशा प्रकारे मुलांची मानसिक व शारीरिक पिळवणूक त्यांच्या अशिक्षीतपणामुळे सहज झाली. शासनाच्या पुनर्वसन योजनेचा अहवाल वेळोवेळी सादर करावा अशी सूचना दिली. शासनाने पुनर्वसनाची योजना आखताना त्याची परिणामकारक पूर्तता करून मुलांवरचा अत्याचार कमी करावा, अशी शिफारस केली. तसेच शासनाने योग्य पाऊल उचलून विविध विभाग जे मुलांच्या कल्याणासाठी कार्य करतात, त्यांच्याबरोबर योग्य सहकार्य करून संबंधित कायदे म्हणजे बॉन्डेड लेबर सिस्टिम (अबोलिशन) ॲक्ट, १९७६, ज्युवेनाईल जस्टीस (केअर अँड प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन)

ॲक्ट, २००० व चाईल्ड लेबर (प्रोहीबिशन ॲंड रेग्युलेशन) ॲक्ट, १९८६ व चिल्ड्रन ॲक्ट व स्किम इंटरनॅशनल लेबर प्रोजेक्ट (रिवाईज) २००३, ज्यांचा आधार आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेचे निर्देश व शासन निर्णय तारीख २९ जून २००४ नुसार पूर्तता करावी.

आयोगाने गैरकानुनी अटक झालेल्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले व तो मोबदला दोषी पोलीस कर्मीकडून वसूल केला जावा असे निर्देश दिले.

**(२) प्रकरण नं. १२०५/२००३**

मिड-डे वर्तमान पत्रामध्ये लेख प्रकाशित झाला, त्याची आयोगाने स्वतः होऊन नोंद घेतली.

| | | |
|---|---|---|
| तक्रारीची तारीख | : | २४ जून २००३ |
| फिर्यादी | : | श्री. मोहन क्रिश्नन, मालाड (पूर्व), मुंबई |
| प्रतिवादी | : | आयुक्त महिला व बालविकास, पुणे. |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचे स्वरूप :** डोंगरी चिल्ड्रन होममधील रेल्वे स्टेशनमध्ये सापडलेल्या मुलांच्या सुटकेबाबत.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** आयोगाने हे प्रकरण आयोगाच्या तपास विभागाकडे तपास करून अहवाल सादर करण्यासाठी दिले. राज्य मानवी हक्क आयोगाला मुले रेल्वे स्टेशनमध्ये सापडली व डोंगरीच्या चिल्ड्रन होममध्ये पाठवण्यात आली याबद्दल तक्रार मिळाली. आयोगाने ह्या प्रकरणांत तात्काळ चौकशी करून अहवाल देण्यासाठी स्थानिक पोलीस अधीक्षकांना आदेश दिले. त्यानंतर आयोगाने परिविक्षा अधिका-याकडून नोंदवह्या मागविल्या. परिविक्षा अधिकारी युनीट नं. ८ निरिक्षण गृह, ऊमरखाडी, मुंबई यानी तारीख ३० सप्टेंबर २००३ रोजीच्या अहवालामध्ये सांगितले की, प्रकरणामध्ये योग्य चौकशी केली गेली, त्यामध्ये असे आढळले की जो मुलगा रस्त्यावर दिनांक १८ फेब्रुवारी २००३ रोजी भटकत होता तो ताडदेव पोलीस ठाण्याअंतर्गत सापडला असून ताडदेव पोलीस ठाण्याने त्या मुलाला अध्यक्ष, बालकल्याण समिती, मुंबई यांच्या ताब्यात दिला. मुख्य सचिव, महिला व बालविकास खाते, मंत्रालय, मुंबई याना आयोगापुढे दिनांक २३ मार्च २००४ रोजी हजर होण्यास आदेशसुद्धा दिले गेले, परंतु मुख्य सचिव यानी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट शासन, पुणे याना आयोगापुढे शासनातर्फे बाजू मांडण्याचा अधिकार दिला. आयुक्तानी सविस्तर अहवाल दिनांक २३ जून २००४ रोजी सादर केला.

**आयोगाचा निर्णय :** आयोगाने हे प्रकरण विषेश पोलीस महानिरीक्षक, तपास शाखेकडे सखोल तपासासाठी पाठविले. आयुक्त, महिला व बाल विकास महाराष्ट्र शासन, पुणे यांच्याकडून अहवाल मागविला.

आयुक्त, महिला व बाल विकास महाराष्ट्र शासन, पुणे यांच्याकडून दि. २३ जून २००४ रोजी अहवाल मिळाला. अहवालामध्ये असे दिसले की, ३५ मुले बालसुधारगृह, डोंगरी येथे दाखल केली, त्यापैकी फक्त एक सोडून सर्वांना त्यांच्या आई-वडिलांकडे पाठविले. त्यापैकी एक मुलगा नेपाळवरून आला होता व त्याला त्याच्या आई-वडिलांकडे पाठविण्यासाठी सर्व काळजी घेतली गेली. विशेष पोलीस महानिरीक्षक यांनी सूचविले की कायदेशीर पालकांच्या ताब्यातून हरवलेल्या मुलांची ही गंभीर समस्या दूर करण्याकरिता पाऊले उचलली

पाहिजेत. आयोगाला हे गरजेचे वाटते की, सर्व संबंधित खात्यांकडून म्हणजेच जी खाते हरवलेल्या, लापता झालेल्या व कोठडीमध्ये असणा-या मुलासंबंधी कार्यरत आहेत त्यांच्याकडून आवश्यक ती माहिती तसेच सध्या जी पद्धत अवलंबली जाते त्याची माहीती एकत्रीत मागवावी. त्या माहितीच्या आधारावर शासकीय कृती धोरणाबाबत शिफारस करावी.

सचिव व विषेश पोलीस महानिरीक्षक यांना विनंती केली की, आवश्यक माहिती गोळा झाल्यानंतर शासनाला शिफारस करण्यासाठी आराखडा तयार करावा व तोच आराखडा आयोगापुढे ठेवावा.

सचिवांना सांगितले गेले की, त्यांच्या वेगळ्या सूचना आयोगाच्या मान्यतेसाठी ठेवाव्या. या आदेशाने प्रकरण संपुष्टात आले.

**(३) प्रकरण नं. ११४०/२००३**

| | | |
|---|---|---|
| आदेशाची तारीख | : | १७ सप्टेंबर २००४ |
| फिर्यादी | : | मच्छीमार नगर, माहिम कोळी |
| प्रतिवादी | : | माहिम पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी, मुंबई |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचे स्वरूप :** माहीम पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिका-यानी सी.एच.एस. च्या सदस्यांना अन्यायपूर्वक अटक केल्याबद्दल.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने अटकेबाबत दिलेल्या निर्देशांविरुद्ध व बेकायदेशीरपणे ही अटक होती. आयोगाने निरीक्षण केले की अटक अयोग्य असून, अदखलपात्र गुन्ह्यामध्ये अटकेची आवश्यकता नव्हती.

**आयोगाचा निर्णय :** आयोगाने राज्य शासनाला शिफारस केली की संबंधित पोलीस निरिक्षकाविरुद्ध खात्यातील चौकशी करावी व रुपये १०,००० पोलीस निरिक्षक श्री. करंडे, यांच्याकडून वसूल करून मोबदला म्हणून देण्यात यावा व निर्णयाचे पालन केल्याबद्दलचा अहवाल सहा आठवड्यामध्ये सादर करावा.

**(४) प्रकरण नं. १९६५/२००२**

| | | |
|---|---|---|
| आदेशाची तारीख | : | २७ ऑक्टोबर २००२ |
| फिर्यादी | : | श्रीमती माया साहेबराव भोंगे, अमला, चांदूर रेल्वे, जिल्हा-अमरावती |
| प्रतिवादी | : | पोलीस अधीक्षक, अमरावती (ग्रामीण) |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचा प्रकार :** फिर्यादीचा नवरा विद्युत शॉकने म.रा.वि.म. चंदुरपुर रेल्वे येथे मरण पावला. मृताचे शरीर म.रा.वि.म. च्या एल.टी. विद्युतच्या खांब्यावर लटकत असलेले सापडले. मृतकाच्या विधवेने तक्रार करून सुद्धा पोलिसांनी तक्रारीवर कार्यवाही केली नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** आयोगाने दि. ९ जानेवारी २००३ रोजी सूचना दिल्या व पोलीस अधीक्षकांकडून अहवाल मागविला. पोलीस अधीक्षक, अमरावती यांनी सविस्तर अहवाल दि. १३ मे २००३ रोजी सादर केला. तसेच प्रतीवादी नं. २, अधीक्षक अभियंता, म.रा.वी.म., अमरावती यांनी दि. २९ ऑक्टोबर २००३ रोजी श्री. ए. डी. एदलाबादकर, कनिष्ठ अभियंता, चांदुर रेल्वे, अमरावती, जिल्हामार्फत आयोगाला लेखी जवाब दिला.

**आयोगाचा निर्णय :** प्रकरणाची सुनावनी वेळोवेळी केली गेली, व दि. १० डिसेंबर २००३ रोजी अधीक्षक अभियंता, म.रा.वि.म., अमरावती यांना आदेश दिले की, अहवाल सादर करावा. पोलीस अधीक्षक, अमरावती यांना आदेश दिले की, अधिका-यांनी जी वेगवेगळी भुमिका घेतली या प्रकरणाचा पुन्हा तपास करावा.

विचार करण्यासारखे आहे की, उप पोलीस अधीक्षक (गृह) यानी पोलीस अधीक्षक, अमरावती यांच्याद्वारे दि. ७ एप्रिल २००४ चा अहवाल सादर केला की, प्रकरणाचे परिक्षण केल्यावर गुन्हा नं. ३१/२००४ धारा ३०४(अ) भा.द.वि. प्रमाणे ज्यांची नावे दिलेली आहे त्या शेतक-यांविरुद्ध नोंद करण्यात आला. यावरून असे स्पष्ट होते की, आयोगाने हस्तक्षेप केल्याने फिर्यादीला न्याय मिळाला आहे. हे प्रकरण न्यायालयामध्ये न्यायाधीन आहे, म्हणून तपासाची आवश्यकता नाही. हे प्रकरण बंद केले.

**(५) प्रकरण नं. १९६२/२००३**

| | | |
|---|---|---|
| आदेशाची तारीख | : | ७ सप्टेंबर २००४ |
| तक्रार | : | |
| प्रतिवादी | : | (१) पोलीस आयुक्त, मुंबई<br>(२) पोलीस उप-आयुक्त विभाग, मुंबई |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचा प्रकार :** पोलीस उप निरीक्षक श्री. बी. सानप यांनी चौकशीवेळी १६ वर्षीय मुलाला क्रूर, अमानवीय व तुच्छ वागणूक कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता दिली.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** पोलीस आयुक्त, मुंबई, यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला. पोलीस उप आयुक्त यानी सविस्तर अहवाल सादर करून सांगितले की, पोलीस उप निरीक्षक श्री. बी. सानप यांनी स्मरण यास पोलीस स्टेशनमध्ये बोलविण्याची गरज नव्हती. त्यानी पोलीस उप निरीक्षक बांना बोलावून सूचना दिली की, त्यांनी मुलाला अकारण पोलीस स्टेशनला आणले म्हणून त्यांचे तीन महिन्यांची वेतनवाढ थांबविण्याचा दंड दिला.

**आयोगाचा निर्णय :** पोलिसांनी मोहिनी शेटेची तक्रार अदखलपात्र नोंदवण्यात आली. परंतु पोलीस उप निरीक्षक श्री. सानप यांनी स्मरणला पोलीस ठाण्यात आणले, त्यावेळी त्याचे वडिल घरी नव्हते. आयोगाने बचावाला मान्यता न देता अन्याय व अत्याचाराबाबत बालहक्कांची हमी या अधिकारावर जोर दिला. व तेथे समाधानकारक पुरावा होता की, स्मरण या १६ वर्ष वयाच्या मुलास चौकशी दरम्यान क्रूर, अमानवीय व तुच्छ वागणूक कुठलेही न्यायिक कारण नसतांना दिली. पोलीस अधिका-याची वागणूक कडक निंदास्पद आहे. सर्वोच्च

न्यायालयाप्रमाणे पोलीस अधिका-यांकडून अधिकाराचा गैरवापर झाल्याने वैयक्तिक जबाबदारीची कल्पना विचारात घेऊन आयोगाने पिडीताला रुपये १५,००० मोबदला देण्यास सांगितले व तो जबाबदार पोलीस अधिका-याकडून वसूल करण्यास सांगितले व सहा आठवड्यात पूर्तता केल्याचा अहवाल सादर करण्यास सांगितले.

**(६) प्रकरण क्र २१३८/२००३**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | श्रीमती हंसाबाई एम सूर्यवंशी, भांडुप गाव, मुंबई. |
| प्रतिवादी | : | पोलीस आयुक्त, मुंबई. |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचे स्वरूप :** पोलिसांनी तक्रारदाराची फसवणूक झाल्याची तक्रार नोंदवून घेण्यास नकार देऊन फक्त अदखलपात्र तक्रार नोंदवली.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** आयोगाने पोलीस आयुक्त, मुंबई यांना सूचना देऊन अहवाल मागविला पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ७, मुंबई यांनी सदर सूचनेस अनुसरून दि. १८ मे २००४ रोजी अहवाल सादर केला. त्यात त्यांनी तपास अधिका-यावर केलेल्या आरोपात काही तथ्य नसल्याचे नमूद केले.

**आयोगाचा निर्णय :** सदरची तक्रार ही एका विधवा महिलेची आहे. तीची फसवणूक झालेली असून देखील पोलिसांनी फक्त अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याबाबतची तक्रार आहे. तक्रारदार हीने दि. ८ ऑक्टोबर २००३ रोजी कांजुरमार्ग पोलीस ठाणे, मुंबई यथे तक्रार केली होती. आयोगाने पोलीस आयुक्त, मुंबई यांना दिलेल्या सूचनेनुसार पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ७, मुबई यांनी दि. १८ मे २००४ रोजी अहवाल सादर केला व त्या अहवालात असे नमूद केले की दोन्ही गटामध्ये समझोता झाल्यामुळे तक्रारदार हीने दि. २० मार्च २००४ रोजी तिची तक्रार मागे घेण्याचा अर्ज दिला. त्यापुढे असेही नमूद करण्यात आले की, तक्रारदाराकडून घेतलेली जादा रक्कम परत करण्यास विरोधी पक्ष श्री. गुरूनाथ तांडेल तयार आहेत. या आश्वासनामुळे तक्रारदाराने आता कुठलीही तक्रार नसल्याचे सांगीतले.

आयोगाने केलेल्या मध्यस्थीमुळे तक्रारदाराच्या तक्रारीचे निरसन झाले व तीला न्याय मिळाला, यास्तव तपासाची आवश्यकता नाही. सदर प्रकरण मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ चे कलम १७ (१)(ब) नुसार बंद करण्यात आले.

**(७) प्रकरण क्र. ८९८/२००४**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | श्री. अंजन मृत्यूंजय श्रीवास्तव, अंधेरी पश्चिम, मुंबई |
| प्रतिवादी | : | मा. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर |
| गणसंख्या | : | एक न्यायासन |

**तक्रारीचे स्वरूप :** तक्रारदाराने असे नमूद केले की, जवळपास वीस लाख मतदारांचे मतदार यादीत नाव नसल्यामुळे त्यांना लोकसभा निवडणुकीत मतदान करू दिले नाही. त्यांच्या मतदानाच्या मुलभूत हक्काचे उल्लंघन झाले.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** आयोगाने मुख्य निवडणूक अधिकारी यांना सूचना देऊन बोलावले.

**आयोगाचा निर्णय :** शासनाने सर्व व्यक्तींना मतदानाचा हक्क बजावता यावा ह्यासाठी सक्रीय प्रभावी उपाययोजना करावे, जेथे आवश्यकता आहे तेथे मतदार नोंदणीची सोय उपलब्ध करावी आणि सर्व अडथळे दूर करावे मतदाराचे शिक्षण व त्याची नोंदणीची अवश्यकता याची परिणामकारक अंमलबजावणी कलम २५ प्रमाणे करावी.

आयोग शिफारस करते की निवडणूक आयुक्त यांनी या सूचना आंतरराष्ट्रीय तरतुदींच्या अनुषंगाने विचारात घ्यावे.

या प्रकारे सदरचे प्रकरण निकाली काढण्यात आले आहे.

**(८) प्रकरण क्र. ९६९/२००१**

| | | |
|---|---|---|
| तारीख | : | १९/११/२००१ |
| तक्रारदार | : | डॉ. लिओ रिबेरो, कांदिवली पूर्व, मुंबई |
| गैरअर्जदार | : | (१) श्री. प्रमोद राणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक |
| | | (२) श्री. प्रकाश वसंत बेले, पोलीस निरीक्षक |
| गणसंख्या | : | संपूर्ण न्यायासन |

**तक्रारीचे स्वरूप :** पोलिसांनी केलेला छळ तसेच त्याचे तपास करण्याच्या अधिकाराची चुकीच्या पद्धतीने व बेकायदेशीर रित्या अंमलबजावणी केली त्यामुळे भारतीय संविधानातील मुलभूत हक्कांचा भंग झाला तसेच आरोपीताच्या व्यक्तीगत स्वातंत्र्यांवर घाला घातला.

**मा.आयोगाकडून केलेली कार्यवाही :** आयोगाने गैरअर्जदार यांना दि. १४ डिसेंबर २००१ रोजी नोटीशीची बजावणी करून त्यांचेकडून अहवाल मागविला आणि दि. २५ जानेवारी २००२ रोजी पोलिसांकडून अहवाल प्राप्त केला तसेच डॉ. रिबेरो यांनी यासोबत दि. २० मार्च २००२ रोजी ॲग्नीस पाटोळे यांचे शपथपत्र सादर केले तसेच श्री. प्रभाकर दादा पोटले यांनी ॲग्नीस पाटोळे यांचे सत्यतेसाठी शपथपत्र दाखल केले.

श्री. प्रमोद राणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दि. ४ एप्रिल २००२ रोजी शपथपत्र सादर केले आणि त्यासोबत यांनी पोलिसांचे ताब्यात घेण्याचा अर्ज त्यावरील मा. महानगर दंडाधिका-याचे आदेश आणि जामीन अर्जाचे प्रती सादर केला.

**मा.आयोगाचा निर्णय :** मा.आयोगाने असा निर्णय दिला की, महाराष्ट्र सरकारने नुकसानभरपाई म्हणून रु. २५००० श्रीमती ॲग्नीस पाटोळे यांना द्यावेत. सरकारला वाटले तर सदर रक्कम दोन्ही अधिका-यांकडून समप्रमाणात वसूल करण्यात यावी तसेच पुढे असेही निर्देशित करण्यात आले की, श्री. राणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बेले, पोलीस उप निरीक्षक यांचे विरोधात कडक विभागीय कार्यवाही करण्यात यावी, कारण त्यांनी मानवी हक्कांचे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन केले आहे.

वरील शिफारशी कलम १८ (जे), १८(३) मानवी हक्क अधिनियम, १९९३ अन्वये दिलेल्या आहेत. तसेच कलम १८(५) अन्वये राज्य शासनाने आयोगास पुढील कार्यवाहीबाबतचा अहवाल ६ आठवड्यात सादर करावा.

**(९) प्रकरण क्र. स्वयं खुद्द १/२००४**

तारीख : १६/०२/२००४ लोकसत्ता वृत्तपत्र

प्रतिवादी : पोलीस महासंचालक, कारागृह पुणे, पोलीस महानिरीक्षक कारागृह पुणे.

गणसंख्या : एक न्यायासन

**तक्रारीचे स्वरूप :** नाशिक मध्यवर्ती कारागृह अधिका-यांनी श्रमिकनगर झोपडपट्टीमधील रहिवाश्यांना मारहाण केल्याबाबत.

**आयोगाने केलेली कार्यवाही :** आयोगाने पोलीस महानिरीक्षक कारागृह, पुणे यांना सूचना देऊन अहवाल मागविला. सदर नोटीस संदर्भात आयोगाने पोलीस महानिरीक्षक, कारागृह पुणे यांनी दि. १७ मार्च २००४ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार ९.१० ते ९.१५ वाजता संकटकालीन सराव प्रात्यक्षिके आयोजित केलेली होती. परंतु जे नियमानुसार तुरूंगाबाहेर गेले होते त्यांनी १५ मिनिटात मुख्य दरवाज्यात यायला हवे होते. साधारणतः ९.३० वाजता श्री. अत्रे यांनी पळालेल्या कैद्यांना शोधण्याचे आदेश दिले. त्यांच्या हातात नेहमीप्रमाणे काठ्या आणि शिट्या होत्या. शोध घेतांना ते शिट्या वाजवत होते व काही कर्मचारी झोपड्याच्या रांगेजवळ शोध घेत होते. त्यामुळे झोपड्यात राहणा-या रहिवाशांना असे वाटले की, तुरूंग कर्मचारी त्यांच्या घरावर व कुटुंबावरच हल्ला करण्यासाठी येत आहेत. म्हणून त्यांनी तुरूंगरक्षकांवरच दगड फेकण्यास सुरूवात केली. त्यांचेवर हल्ला झाल्यामुळे त्यांनी कमीत कमी बलाचा वापर केला.

**आयोगाचा निर्णय :** आयोगाने पोलीस महानिरीक्षक, कारागृह पुणे यांना अंतिमतः अशी शिफारस केली की, श्री. राजाभाऊ नाना कदम यांना नुकसानभरपाई रोख रक्कम १०,००० रुपये सहा आठवड्यात द्यावी आणि कार्यपूर्तीचा अहवाल आयोगास सादर करावा.

तसेच आयोगाने पुढे असे आदेश दिले आहेत की, श्री. व्ही. बी. अत्रे, प्रभारी व्यवस्थापक व श्री. आय. एन. पवार, वरिष्ठ तुरूंगाधिकारी, नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक यांचेवर त्यांनी संकटकालीन सराव प्रात्यक्षिक अमलबजावणी महाराष्ट्र राज्य कारागृह शिस्त अधिनियम, १९६६ नुसार कसूर केल्यामुळे त्यांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश दिले. कार्यपूर्ती केल्याचा अहवाल आयोगास आठ दिवसांत सादर करावा.

## प्रकरण ७

मानवी हक्क कायदा, १९९३ कलम १२ प्रमाणे आयोग मानवी हक्कासाठी आयोग खालील सर्व किंवा त्यापैकी कोणतेही कार्य पार पाडील.

१. स्वतःहून अन्यायग्रस्त प्रकरणात चौकशी करणे किंवा अन्यायग्रस्त व्यक्तीच्या अर्जावर चौकशी करणे.

(अ) मानवी हक्कांचा भंग किंवा त्यास अपप्रेरणा देणे किंवा ;

(ब) अशा हक्क भंगास प्रतिबंध करण्यास लोकसेवकाकडून झालेला निष्काळजीपणा.

२. मानवी हक्कांचा भंग झाल्याचा कोणताही आरोप असलेल्या व कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेल्या कार्यवाहीत त्या न्यायालयाच्या संमतीने हस्तक्षेप करील ;

३. राज्यशासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही तुरुंगात किंवा अन्य एखाद्या संस्थेत उपचाराच्या, सुधारण्याच्या किंवा सुरक्षततेच्या प्रयोजनार्थ व्यक्तीस स्थानबद्ध केलेले किंवा ठेवून घेण्यात आलेले असेल त्या तुरुंगाला वा संस्थेला राज्य शासनाला सूचना देऊन त्या आवासी व्यक्तींच्या तेथील राहनीमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देईल आणि त्यासंबंधी शिफारस करेल ;

४. संविधानाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी पुरवण्यात आलेल्या संरक्षक उपायांचा आढावा घेईल व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी उपाय योजनांची शिफारस करील ;

५. मानवी हक्कांच्या उपभोगामध्ये प्रतिबंध करणा-या दहशतवादी कृत्यास असलेल्या घटकांचे, पुनर्विलोकन करून त्यावर उचित सुधारात्मक उपाययोजनांची शिफारस करील ;

६. मानवी हक्काच्या क्षेत्रात संशोधन कार्य हाती घेईल व त्यास चालना देईल ;

७. मानवी हक्कांबाबतची जाण समाजाच्या विविध वर्गात निर्माण करण्यासाठी जागृती करणे आणि प्रकाशने, प्रसारमाध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधने याद्वारे मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षक उपाययोजनांची माहिती करून देण्यासाठी चालना देईल ;

८. मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करणा-या अशासकीय संघटना आणि संस्था यांना ते करीत असलेल्या प्रयत्नांना उत्तेजन देईल ; आणि

९. खाजगी क्षेत्रात काम करणा-या अशासकीय संस्थांना प्रोत्साहन देणे, मानवी हक्कांच्या संरक्षणसाठी आवश्यक वाटतील अशी इतर कार्ये करील.

**आयोगाच्या कार्यप्रणालीवर प्रकाशझोत :**

मानवी हक्क आयोग सामाजिक व राजकीय अधिकार, तसेच आर्थिक व सांस्कृतिक अधिकार या दोन्ही क्षेत्रात कार्य करेल. आयोग मानवी हक्क संरक्षण आणि त्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता विविध क्षेत्रात कार्य

करीत असतो जसे की पोलीस कोठडीमधील आणि कारागृहातील मृत्यू, बलात्कार, प्रताडना, पोलीस कार्यप्रणाली मधील मानवी हक्क अबाधित ठेवणे संबंधी सुधारणा, बाल सुधार गृह (रिमांड होम) मानसिक रुग्णासाठीचे रुग्णालयातील सुधारणा इत्यादी क्षेत्रात कार्य करील.

आयोगाच्या विविध जबाबदारीची व्याप्ती आणि जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन आयोग पुढील संशोधन व उपक्रम हाती घेईल :-

- पोलीस कोठडीतील मृत्यू, बलात्कार व छळ या संबंधीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना
- पोलीस कोठडी, कारागृह व स्थानबद्धतेच्या इतर केंद्रामध्ये पद्धतशीरपणे सुधारणा
- वेठबिगार व बालमजूर ही पद्धत बंद करणे
- एचआयव्ही/एड्सबाधीत व्यक्तींचे मानवी हक्क
- सार्वजनिक आरोग्य मानवी हक्कांचे प्रकरण
- महिला व बालक, अल्पसंख्याक, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती मोठ्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेले लोक यासारख्या कमकुवत गटाचे लोंकाचे हक्क
- कार्यकारी गट व पोलीस प्रशासन यांना मानवी हक्कांसंबंधीचे शिक्षण देण्याबरोबर समाजामध्ये मानवी हक्कांसंबंधी जाणीव निर्माण करणे. चक्रीवादळ, भूकंप, उलकापात यासारख्या नैसर्गिक आपत्तीने बाधित झालेल्या तसेच वायुगळती, साथीचे रोग व दंगे यासारख्या आपत्तीने बाधीत झालेल्या लोंकाच्या मानवी हक्कांना चालना देणे तसेच त्यांच्या मानवी हक्कांबाबत शिक्षण देणे, जागृती निर्माण करणे.